**फौजदारी प्रक्रिया संहित, १९७३ चे कलम २७२ व २७७ नुसार न्यायालयीन**

**भाषा मराठीत पुरावा**

**अभियोजन पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०३ ची शपथेवर साक्ष**

मी शपथपुर्वक निवेदन करातो की:

माझे नावः रोशन विष्णू चाफेकर,

वयः २९ वर्षे, व्यवसायः नोकरी,

राहणारः वरसे, रोहा, ता.रोहा, जि.रायगड.

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. एस. म्हात्रे यांच्यामार्फत :**

०१. अंदाजे तीन–चार वर्षापूर्वी रोहा शहरातील हनुमान टेकडीच्या मागे परीसरामधुन गाईची तस्करी होत असल्याची चर्चा मी ऐकली होती. अंदाजे तीन–चार वर्षापूर्वी ऑक्टोंबर महिन्यामध्ये हनुमान टेकडीचे रस्त्याने समोर काही व्यक्ती गाईंना टेम्पोमध्ये टाकून घेऊन जात असल्याबाबत मला माहीती मिळाली. त्यानंतर मी माझे मित्र अंकित मोहिते व रीतेश जाधव यांना फोन करुन त्या संबंधी माहीती दिली. त्यानंतर रात्री ८.३० वाजण्याच्या दरम्यान आम्ही सदर टेम्पो गेला त्या दिशेने गेलो असता हनुमान टेकडीचे पुढे तांबडीच्या दिशेने काही अंतरावर सदर व्यक्तीने आम्हाला बघुन टेम्पो वाहन थांबविले. सदर टेम्पोचा नोंदणी क्र. MH06/3885 होता. त्यामध्ये दोन व्यक्ती होते. ते खाली उतरल्यानंतर आम्ही सदर टेम्पोची मागील पडदा बाजूला करुन पाहणी केली असता त्यात गाई असल्याचे आम्हाला आढळले. आम्ही सदर व्यक्तींना गाई कुठे घेऊन चालले, असे विचारले असता त्यांना काहीही सांगता आले नाही. ते घाबरलेल्या अवस्थेत दिसत होते. गाई एकूण ४–५ होत्या. त्यांच्या अंगावर ठिपके होते. सदर

टेम्पोमध्ये गाईंच्या खाण्यापिण्याची व्यवस्था नव्हती. त्या टेम्पोमध्ये कोंबलेल्या दिसत होत्या. आम्ही सदर व्यक्तींना टेम्पो पोलिस स्टेशनला घेण्याबाबत सांगितले असता अगोदर त्यांनी नकार दिला. परंतु आम्ही त्यांना तगादा लावल्यामुळे त्यांनी टेम्पो, पोलिस स्टेशन, रोहा येथे आणला. मी घडलेली घटना पोलिसांना सांगितली. पोलिसांनी सदर व्यक्तीकडे गुरे नेण्याबाबत परवाना मागितला असता तो त्यांच्याकडे मिळाला नाही. त्यांनतर अंकित मोहिते यांनी घटनेच्या अनुशंगाने पोलिस स्टेशनला तक्रार दिली. त्या अनुषंगाने पोलिसांनी माझे बयान नोंदविले होते. टेम्पो मधील दोन व्यक्तींपैकी एकाचे नाव दानेश खान होते. दुस–याचे नाव आज मला आठवत नाही. ते दोघे आज न्यायालयात हजर असुन आरोपीचे पिंज–यात बसलेले आहेत.

सरतपास पूर्ण.

**आरोपीतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री. डी. एम. वर्मा यांच्यामार्फत सुरू.**

०२. पोलिसांनी माझे बयान घटनेचे दिवशीच घेतले होते. ते त्यांनी मी सांगितले प्रमाणे नोंदविले होते. मी पोलिसांना बयान देते वेळी अंदाजे तीन–चार वर्षापूर्वी रोहा शहरातील हनुमान टेकडीच्या मागे परीसरामधुन गाईची तस्करी होत असल्याची चर्चा मी ऐकली होती, ही बाब सांगितली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, सदर बाब मी आज न्यायालयात प्रथम सांगितली होती.

०३. मी पोलिसांना बयान देते वेळी घटना ऑक्टोंबर महिन्यामध्ये घडली होती, हनुमान टेकडीचे रस्त्याने समोर काही व्यक्ती गाईंना टेम्पोमध्ये टाकून घेऊन जात असल्याबाबत मला माहीती मिळाली, त्यानंतर मी माझे मित्र अंकित मोहिते व रीतेश जाधव यांना फोन करुन त्या संबंधी माहीती दिली, त्यानंतर रात्री

८.३० वाजण्याच्या दरम्यान आम्ही सदर टेम्पो गेला त्या दिशेने गेलो असता हनुमान टेकडीचे पुढे तांबडीच्या दिशेने काही अंतरावर सदर व्यक्तीने आम्हाला बघुन टेम्पो वाहन थांबविले, त्यामध्ये दोन व्यक्ती होते, टेम्पोची मागील पडदा बाजूला करुन पाहणी केली असता त्यात गाई असल्याचे आम्हाला आढळले, त्यांना काहीही सांगता आले नाही, ते घाबरलेल्या अवस्थेत दिसत होते, गाई एकूण ४–५ होत्या, त्यांच्या अंगावर ठिपके होते, आम्ही सदर व्यक्तींना टेम्पो पोलिस स्टेशनला घेण्याबाबत सांगितले असता अगोदर त्यांनी नकार दिला, परंतु आम्ही त्यांना तगादा लावल्यामुळे त्यांनी टेम्पो, पोलिस स्टेशन, रोहा येथे आणला, या बाबी सांगितल्या होत्या. मी सांगितल्याप्रमाणेच पोलिसांनी माझे बयानामध्ये नमुद न करण्याचे कारण मी सांगू शकत नाही.

०४. हे म्हणणे खरे आहे की, मी सुराज्य सामाजिक प्रतिष्ठान संस्थेचा अध्यक्ष आहे, मी भारतीय जनता पक्षाचा कार्यकर्ता आहे, मला गाईंच्या अनुषंगाने माहिती मिळाल्यानंतर मी ती प्रथम पोलिस स्टेशनला सांगितली नाही, विशाल शेलार, अक्षय माडे, उमेश सावंत, मयुर कोंडार, अंकित मोहिते व राकेश महामुनी माझे मित्र आहेत.

०५. हे म्हणणे खरे आहे की, मी पोलिस स्टेशनला गेलो त्यावेळी तेथे ५०–१०० लोक जमा झाले होते, सुरवातीला पोलिस आमची तक्रार नोंदवून घ्यायला तयार नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी माझा राजकीय दबाव वापरुन पोलिसांना फिर्याद नोंदवून घ्यायला लावली. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासणीमध्ये सांगितल्याप्रमाणे कुठलीही घटना घडली नाही, अंदाजे ३–४ वर्षापूर्वी हनुमान टेकडीचे मागील रस्त्यावरुन गाईंची तस्करी होत असल्याची चर्चा

मी ऐकली नव्हती, त्यावरुन मला मिळालेल्या माहीती वरुन हनुमान टेकडीचे पुढे रस्त्याचे दिशेने गेलो असता एका टेम्पोमध्ये मागील बाजूस ५–६ गाई कोंबलेल्या अवस्थेत मला आढळलेल्या नव्हत्या, आरोपींना त्या अनुषंगाने समाधानकारक उत्तरे देता आली होती, आम्ही त्यांना टेम्पो पोलिस स्टेशनला घ्यायला सांगितला नव्हता, पोलिसांना आरोपीकडे गाई वाहतुकीच्या अनुषंगाने परवाना आढळला होता, अंकित मोहीते यांनी पोलिस स्टेशनला खोटी फिर्याद दिली होती.

०६. हे म्हणणे खरे आहे की, मला मिळालेली माहीती आरोपींच्या नावानिशी व टेम्पोचे नोंदणी क्रमांकासह मिळाली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलिसांना खोटे बयान साक्ष दिली व आज न्यायालयात खोटी साक्ष दिली.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

sunil sakharam mahale
Digitally signed by sunil sakharam mahale
Date: 2023.10.03 17:24:22 +0530

स्थळ : रोहा. (एस. एस. महाले)
दि.०३.१०.२०२३. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.